# परिपत्रक

नाशिक महानगरपालिका,नाशिक
जा.क्र.आस्था/वशि/ ८३९/२०२० दिनांक१०/०४/२०२०

**विषय**: नाशिक महानगरपालिका सेवेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांची ०१ जानेवारी, २०१७, ०१ जानेवारी, २०१८, ०१ जानेवारी,२०१९ व ०१ जानेवारी, २०२० रोजीची स्थिती दर्शविणारी सेवाजेष्ठता यादी वरील हरकतीस मुदतवाढीबाबत

**वाचा** :- १) महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन),नियम १९८२.
२ सामान्य प्रशासन शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दिनांक २१/१०/२०११
३) जा.क्र.आस्था/वशि/७१३/२०२० दिनांक २४/०३/२०२० चे परिपत्रक
४) मा.अध्यक्ष,म्युनिसिपल कर्मचारी-कामगार सेना,नाशिक यांचेकडील जावक क्रमांक ३६/२०२० दिनांक ०८/०४/२०२० रोजीचे पत्र.

महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियम १९८२, व सामान्य प्रशासन,शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२,दिनांक २१/१०/२०११ मधील तरतूदीनुसार नाशिक महानगरपालिका सेवेतील तांत्रिक/अतांत्रिक संवर्गातील गट-अ ते गट-ड मधील अधिकारी/कर्मचारी यांची व लेखा / लेखापरिक्षण संवर्गातील ०१ जानेवारी,२०१३, ०१ जानेवारी,२०१४, ०१ जानेवारी,२०१५, ०१ जानेवारी, २०१६, ०१ जानेवारी, २०१७, ०१ जानेवारी,२०१८, ०१ जानेवारी,२०१९ व ०१ जानेवारी,२०२० व उर्वरीत संवर्गाची ०१ जानेवारी, २०१७, ०१ जानेवारी,२०१८,०१ जानेवारी,२०१९ व ०१ जानेवारी, २०२० रोजीची स्थिती दर्शविणाऱ्या संवर्गनिहाय स्वतंत्र प्रारुप सेवाजेष्ठता याद्या तयार करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या याद्या नाशिक महानगरपालिकेच्या अधिकृत संकेत स्थळ www.nmc.gov.in यावर सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे माहितीसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

ज्या अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे जेष्ठतेबाबत किंवा इतर कर्मचाऱ्यांचे जेष्ठतेबाबत काही हरकत असल्यास,त्याचप्रमाणे सेवाजेष्ठता यादीतील नमूद शैक्षणिक अर्हता,जातीचा प्रवर्ग,जन्म तारीख, सेवानिवृत्तीचा दिनांक इत्यादीबाबत काही हरकती/सुचना असल्यास नाशिक महानगरपालिकेच्या dmc_gad@nmc.gov.in या ई-मेल आयडी वर लेखी हरकत स्वाक्षरीनिशी कागदपत्रांसह (Scan pdf) दिनांक २६/०३/२०२० पासून १५ दिवसांचे आंत पाठविणेबाबत उपरोक्त वाचा मधील क्रमांक ३ रोजीचे परिपत्रकान्व्ये कळविण्यात आले आहे. तथापि,उपरोक्त वाचा मधील ४ रोजीचे पत्रान्वये मा.अध्यक्ष,म्युनिसिपल कर्मचारी-कामगार सेना,नाशिक यांनी सद्या कोरोना (कोव्हिड-२०१९) संदर्भात नाशिक शहरात लॉकडाऊन असल्यामुळे तसेच कर्मचारी साथीचे विरोधात लढा देत असल्यामुळे दिलेल्या हरकतीच्या मुदतीस वाढ करुन देण्यास विनंती केली आहे.

मा.अध्यक्ष,म्युनिसिपल कर्मचारी-कामगार सेना,नाशिक यांनी केलेली मागणी विचारात घेता उक्त जेष्ठतेबाबत यापूर्वीची हरकत घेण्यास दिलेली मुदत दिनांक ०९/०४/२०२० रोजी संपुष्टात येत असून दिनांक १०/०४/२०२० पासुन पुढील १० दिवसांचे आंत हरकती पाठविणेस मुदत वाढवुन देण्यात येत आहे. सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती/सुचना किंवा आक्षेपांवर विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

०९/०४.
आयुक्त,
नाशिक महानगरपालिका,नाशिक

**प्रत :**
१) सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख/सर्व विभागीय अधिकारी
सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देऊन पोहोच स्वतंत्र नोंदवहीत घेण्यात यावी.
२) संगणक विभागप्रमुख- सदरच्या सेवाजेष्ठता याद्या नाशिक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दिनांक १०/०४/२०२० पासुन पुढील १० दिवसांकरिता प्रसिध्दीसाठी ठेवण्यात यावी.

Scanned by CamScanner